N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** हदगांव **Year (वर्ष):** 2018

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0235 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/12/2018 18:58 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा) 2018 | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 28/12/2018
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/12/2018
**Time From (वेळेपासून):** 13:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/12/2018 **Time (वेळ):** 18:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 019 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/12/2018 18:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लोक सेवक यांचे खासगी तलाठी , कार्यालय बाजार गल्ली हदगाव,हदगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बळवंत लक्ष्मीकांत पेडगांवकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1964 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि कार्यालय नांदेड,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि कार्यालय नांदेड,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9823563135

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बालाजी व्यंकटराव पन्नमवार | | | 1. सांगवी ,नांदेड,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

सरकार तर्फे फिर्यादः लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेडकम्प हदगांव दिनांक 28/12/2018मी बळवंत लक्ष्मीकांत पेडगावकर, वय 54 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे पोलीस निरीक्षक या पदावर दिनांक 09/07/2015 रोजी पासुन कार्यरत आहे. दिनांक 20/12/2018 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री षिवराम गोविंदराव जाधव, वय 36 वर्ष व्यवसाय नोकरी (घ.ता. शिक्षक) रा. दगडवाडी ता. हदगांव जि. नांदेड यांनी पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात हजर येवुन तक्रार दिली ती खालील प्रमाणे समक्ष पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नांदेड येथे येवुन तक्रार लिहुन देतो कि, मी वरील प्रमाणे असुन मौजे दगडवाडी येथील शेत गट क्रमांक 43 व 38 मधिल 1 हेव्टर 13 आर जमिन माझे आजोबा देवराव मारोती जाधव (मयत) यांचे नावे असुन सदरची जमिन माझे वडील श्री गोविदराव देवराव जाधव यांचे नावे वारसाहक्काप्रमाणे करण्यासाठी मा. हदगांव न्यायालयाने तहसिलदार हदगाव यांना आदेष दिलेला आहे. तहसिलदार हदगांव यांनी तलाठी सज्जा हरडफ यांना पत्र देवुन पुढील कार्यवाही करणे बाबत कळविले आहे. सदर शेताचा फेरफार करून वारसाहक्काने शेती माझे वडीलांचे नांवे करण्यासाठी हरडफ सज्जाचे तलाठी श्री पन्नावार यांना दि.15/12/2018 रोजी भेटलो असता त्यांनी मला सदरचा फेरफार करण्यासाठी 5000/रू (पाच हजार रू.) ची मागणी केली. ते मागत असलेले पाच हजार रूपये लाच असल्याचे मला माहिती आहे. त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही लाचेची रक्कम ही मी सोबत आनलेली असुन त्यांचा माझा कोणताही देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तरी मी दिनांक 21.12.2018 रोजी तलाठी श्री पन्नावार यांची भेट घेवुन फेरफार करून माझे वडीलांचे नावावर शेती करण्याबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करून स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही करावी ही विनंती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी आवश्यक असलेले पंच मिळणेसाठी मा. विभाग नियत्रंक, राज्य परिवहन विभाग, नांदेड यांना पत्र देवुन 1) श्री मलेश व्यंकटी मदनुरे 2) श्री सय्यद सादतुल्ला स. लाल यांची पंच म्हणुन सेवा उपलब्ध करून घेतली. दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याबाबत माहीती देवुन त्यांनी सहमती दर्षविल्यानंतर तक्रारदार हे बाहेर गावी राहत असल्याने ते तक्रार देवुन उद्ईक रोजी नियोजीत ठिकाणी भेटणार असल्याने दोन्ही पंचाना दिनांक 21.12.2018 रोजी लाप्रवि कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचाना देवुन घरी जाण्याची परवानगी दिली.त्यानंतर दिनांक 21.12.2018 रोजी पंच लाप्रवि कार्यालयात हजर आल्यानंतर दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांची ओळख करून दिली त्यानंतर षासकीय वाहनाने अर्धापुर मार्गे व्दारका नगरी हदगांव येथे आलो. तेथे तक्रारदारास व पथकातील सर्व सदस्यांची ओळख देणे, तोंडी तक्रार सांगणे, सापळा कार्यवाही बाबत माहिती देणे, तक्रारीवर दोन्ही पंचाच्या सहया घेणे इत्यादी कार्यवाही केली. सदर सापळा कार्यवाहीत डिजीटल व्हाईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्या बाबत तक्रारदार व पंचाना माहिती देवुन डिजीटल व्हाईस रेकडर मध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकर्ड नसल्याची खात्री करून दिली व सदर डिजीटल



Scanned by CamScanner

व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाशण नसल्याची खात्री करून देवुन त्यात आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे परिचय दर्षक वक्तव्य ध्वनी मुद्रीत करण्यात आले. प्रस्तुत तक्रारीच्या अनुशंगाने लाचेचा सापळा लावण्यापुर्वी लोकसेवक यांची भेट घेवुन लोकसेवक पन्नमवार यांची लाचेची मागणी आहे काय? याची पडताळणी करण्यासाठी तक्रारदार, पंच क्र. 1 यांचेसह पोक गाडेकर यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी केली असता लोकसेवक यांनी दयांना देवुन टाका तुमच्या मनाने काय दयायचे ते दया असे म्हणाल्यामुळे लाचेच्या रक्कमेची खात्री न झाल्यामुळे लोकसेवक निवडणुकीचे कामात व्यस्त असल्याने व लोकसेवक यांनी मंगळवार नंतर वेळ भेटेल असे सांगीतल्याने दिनांक 26.12.2018 रोजी लोकसेवक यांची परत लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरवुन लाचमागणी स्थगीती पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर दिनांक 26.12.2018 रोजी तक्रारदार यांना लोकसेवक यांचे खाजगी तलाठी कार्यालयात पाठवुन लोकसेवक लाचमगाणी पडताळणी केली असता लोकसेवक यांची भेट झाली नसल्याने व ते कार्यालयात येणार नसल्याची माहिती मिळाल्याने उर्वरित लाचमागी कार्यवाही दिनांक 28.12.2018 रोजी करण्याचा ठरवुन सदर कार्यवाहीचा लाचमागणी स्थगीती पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर दिनांक 27.12.2018 रोजी तक्रारदार यांना लोकसेवक कोठे भेटतील असे विचारले असता त्यांनी लोकसेवक आज भेटणार नाहीत असे सांगीतल्याने उर्वरित लाचमागणी कार्यवाही दिनांक 28.12.2018 रोजी करण्याचा ठरवुन सदर कार्यवाहीचा लाचमागणी स्थगीती पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर आज दिनांक 28.12.2018 रोजी हदगाव येथे येवुन लोकसेवक पन्नमवार यांचे खाजगी तलाठी कार्यालय बाजार गल्ली हदगाव येथे लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक यांनी लाचमागणी पडताळणी दरम्याण पंच क्र. 1 यांचे समक्ष तक्रारदार श्री जावध यांना त्यांचे आजोबांचे नावे असलेली वडिलोपार्जित जमीन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे फेरफार करण्यासाठी 5,000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4,500 /- रू. लाचेची मागणी करून ती स्वतः स्विकारणार असल्याने घेवुन येणे बाबत सांगीतल्याचे पंच क्र. 1 यांनी सांगीतले व व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाशणावरून निष्पन्न झाल्याने लोकसेवक तलाठी पन्नमवार यांचे विरुध्द लोकसेवक यांचे खाजगी तलाठी कार्यालय बाजार गल्ली हदगांव येथे लाचेचा सापळयाचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानंतर लोकसेवक यांचे खाजगी तलाठी कार्यालयाचे थोडे अलीकडे तक्रारदार, पंच क्रमांक 1 यांना डिजिटल व्हाईस रेकर्डर चालु करून तक्रारदार यांचे अंगावरील शर्टाचे समोरील डाव्या बाजुचे खिषात ठेवुन खाजगी तलाठी कार्यालयात लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पायी रवाना केले व त्यांचे पाठीमागे अंतराने आम्ही व सापळा पथकातील सर्व सदस्य असे पायी रवाना झालो. व खाजगी तलाठी कार्यालय बाजार गल्ली हदगांव परिसरात सापळा लावण्यात आला.सापळा कार्यवाही मध्ये लोकसेवक यांनी पंच क्र 1 श्री मदनुरे यांचेसमक्ष तक्रारास त्यांचे कामासाठी 4500/-रु. लाचेची मागणी करून ती स्वतः उजव्या हाताने स्विकारून त्यांचे बाजुला असलेली लाल रंगाची डायरीवर ठेवले 13.20 वाजताचे सुमारास तक्रारदाराने लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा केला. तेव्हा आम्ही, पंच क्र. 2 श्री सयद व पथकातील सर्व सदस्य असे घटनास्थळी पोहचलो. सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांचे खाजगी तलाठी कार्यालयात जावुन पंचासमक्ष लोकसेवक पन्नमवार यांच्याकडुन लाचेची रक्कम हस्तगत करून सदर कक्षात कृत्रीम अंधार करून लाचेच्या रक्कमेची व लोकसेवक पन्नमवार यांची हाताची व डायरीचे कव्हरची अल्ट्राव्हायलेट लम्पचे प्रकाषात तपासणी केली असता लाचेच्या रक्कमेवर व लोकसेवक यांचे उजव्या हाताचे बोटांवर व डायरीचे कव्हरवर हिरवट चकाकी दिसुन आली. सदरचे डायरी पावडर लागलेल्या ठिकाणी वलयांकित करून पंचासमक्ष तपासकामी ताब्यात घेतले. लोकसेवक पन्नमवार यांचे ताब्यातुन घेतलेल्या नोटांचे वर्णन व क्रमांक सापळापुर्व कार्यवाही दरम्यान नमुद केलेल्या नोटाचे वर्णन व क्रमांकाषी तंतोतंत सारखेच असल्याचे दिसुन आले. सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष पाकीटात टाकुन तपासणी करणेकामी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर आम्ही, दोन्ही आरोपी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यासह षासकीय वाहनाने पोलीस स्टेषन हदगांव येथे आलोत.लाच मागणी पडताळणी, सापळापुर्व कार्यवाहीव सापळा कार्यवाही (घटनास्थळ) पचनामादरम्याण तक्रारदार, लोकसेवक पन्नमवार यांचेत झालेले सभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये वापरण्यात आलेले MMCARAS कंपनीचे 4 GB Micro SDक्षमतेचे मेमरीकार्ड मधील 08 फाईल्सची हष व्हल्यु काढुन ते मेमरी कार्ड पकीटात टाकुन सदरचे पकीट्स लाख मोहर सीलबंद करुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहेत. लाच मागणी पडताळणी,सापळापूर्व कार्यवाही व सापळा कार्यवाहीचा (घटनास्थळ) सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. तरी तक्रारदार श्री जाधव यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 21.12.2018, 26.12.2018, 27.12.2018 व दि. 28.12.2018 रोजी केलेल्या लाचमागणी पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक पन्नमवार यांनी तक्रारदार यांना त्यांचे आजोबांचे नावे असलेली वडिलोपार्जित जमीन तक्रारदार यांचे वडीलांचे नावे फेरफार करण्यासाठी 5,000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 4,500 /- रू. लाचेची मागणी करून ती आज रोजी त्यांचे खाजगी तलाठी कार्यालय बाजार गल्ली हदगांव येथे स्वतः स्विकारून त्यांना मिळणारे कायदेषिर परिश्रमीकाखेरीज पारितोषण म्हणून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला आहे. म्हणून माझी आरोपी लोकसेवक बालाजी व्यंकटराव पन्नमवार वय 52 वर्श, व्यवसाय नोकरी तलाठी, तलाठी सज्जा हरडफ ता. हदगांव जि. नांदेड रा. गोपाळ नगर सांगवी ता.जि. नांदेड, मुळ रा. अबुंलगा (झाडी) ता. मुखेड जि. नांदेड यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (सुधारना) 2018 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे. ही फिर्याद दिली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे कामPCMAH73950 हाती घेतले): Pradeep Shivaji Kakade(I (Inspector)) / **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार



Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

—1863

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पो.स्टे. हदगाव जि. नांदेड

**Name** (नाम): Pradeep Shivaji Kakade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMAH73950



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned by CamScanner